* * *

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेडच्या मानव्यविद्याशाखे अंतर्गत
तत्त्वज्ञान विषयातील पीएच. डी. पदवीसाठी सादर करावयाच्या
शोधप्रबंधाचा संक्षिप्त आराखडा

* शोधप्रबंधाचा विषय *

''शैव तत्त्वज्ञान : एक चिकित्सक अभ्यास''

* संशोधक *

स्वामी सोनू मन्मथप्पा

* मार्गदर्शक *

डॉ. गणेश बेळंबे

तत्त्वज्ञान विभाग प्रमुख
कै. बापुसाहेब पाटील एकंबेकर
महाविद्यालय, उदगीर, जि. लातूर.

जानेवारी – २०२४

* * *

शैव तत्त्वज्ञान : एक चिकित्सक अभ्यास

१) प्रस्तावना :-

मनाला प्रसन्न करणारे कल्याणकारक प्रत्येकाला स्वतःच्या विविध क्षमतांचे भान देणारे आपल्या क्षमता साकार करण्याचे मार्ग दाखविणारे, प्रत्येकाला इतर मानवाशी आणि मानवेत्तर अशा सर्व चराचर सृष्टिशी निकोप रीतीने जोडणारे आणि आनंददायक असे जे अंतिम सत्य स्वरूप विश्वाचे मंगल आणि सुंदर तत्त्व म्हणजे शिव होय !

शिव हेच शैव दर्शनाचे आराध्य दैवत आहे. मानवी जीवनात जे जे उत्तम, उदात्त, निकोप, न्यायाचे माणुसकीचे आणि मानवाच्या सर्व अंतःशक्ति 'विधायक मार्गाने फुलविणारे' असे असते ते ते सर्व शिव आहे असे शैव मानतात. शिवतत्त्व हेच शैव तत्त्वज्ञानाचे अधिष्ठाण आहे. या शैव तत्त्वज्ञानाची मानवी जीवनाला उदात्त आणि सदाचारी बनवणारी विचारसरणी हेच ह्याचे वैचारिक अधिष्ठान आहे.

शिवदेवतेला एकमेव उपास्य दैवत मानणारे संप्रदाय त्याचे तत्त्वज्ञान, बादरायणाच्या ब्रह्मसुत्रापुर्वी निर्माण झाले होते. असे ब्रह्मसुत्रे व त्यावरील शंकरभाष्यावरून सिद्ध होते. इ.स.चे दुसरे शतक हा बादरायणाचा काळ असावा असे मानले होते. विजयानगर साम्राज्याचे प्रधानमंत्री माधवाचार्य (सुमारे १२९६-१३८६) यांनी आपल्या सर्वदर्शन संग्रहात कुलीन पाशुपत दर्शन, शैव दर्शन, प्रत्यभिज्ञा दर्शन, सर्वेश्वर दर्शन, अशा चार शैव संप्रदायाचे विवेचन केलेले आहे. या खेरीज कापालिक, कालामुख, हरिहर, मार्तंड-भैरव, अर्ध-नारीश्वर आणि नाथ संप्रदाय, वीरशैव संप्रदाय असे अन्य काही शैव संप्रदायही आहेत. हे संप्रदाय आपल्या शैव तत्त्वज्ञानावर व दर्शनावर आधारित आहेत.

शैव दर्शन मुख्यतः दक्षिण भारतात प्रचलित आहेत. येथे पति, पशु, आणि पाश

असे तीनच पदार्थ मानले आहेत. पति म्हणजे शिव व ईश्वर. ईश्वराचे अस्तित्व अनुमानाने सिद्ध करता येते. आपण जे जग अनुभवतो ते कार्य (परिणाम) आहे आणि ते कार्य असल्यामुळे कोणा बुद्धिमान व्यक्तिने ते निर्माण केले आहे असे निर्माण होते आणि यावरून अनुमानाच्या द्वारा परमेश्वराच्या अस्तित्वाची सिद्धी उत्पन्न ठरते. कर्तृत्वासाठी शरीर आवश्यक आहे असे मानले, तरी ईश्वराचे शरीर शक्तिरूप अशा पाच मंत्रानी बनलेले आहे. ते आपल्यासारखे नाही. मल, कर्म इत्यादी पाशाच्या समुहाने हे ईश्वर शरीर व्याप्त नसते.

ईश्वराचे शरीर ज्या मंत्रानी बनलेले असते. ते पाच मंत्र पुढीलप्रमाणे :

१) ईशान – हा मंत्र ईश्वराचे मस्तक होय.

२) ततपुरूष – हे ईश्वराचे मुख

३) अघोर– हा मंत्र ईश्वराचे हृदय होय.

४) वामदेव – हे ईश्वराचे गुहस्थान.

५) सद्योजात – मंत्र म्हणजे ईश्वराचे पाय.

हे शरीर ईश्वराच्या स्वइच्छेने निर्मित झालेले आहे. या शक्तिपासून निष्पन्न झालेले ईश्वराचे शरीर अनुक्रमे – अनुग्रह करणे, तिरोधान पावणे, सृष्टिचा संहार करणे, स्थिती राखणे आणि उत्पत्ती करणे या पाच कृत्यांना कारणीभूत होत असते.

तत्त्वज्ञान हे एक सामाजिक शास्त्र आहे. किंबहुना ते इतर सामाजिक शास्त्राची तात्विक बाजु भक्कम करणारी व त्यास वैचारिक आधार प्राप्त करून देणारी एक महत्त्वाची अभ्यासशाखा आहे. या अभ्यासशाखेत सत्तामिमांसा, ज्ञानमिमांसा, तर्कशास्त्र, नितीशास्त्र, सौंदर्यशास्त्र या पाच शाखा आहेत.

संशोधकानी संशोधनासाठी तत्त्वज्ञान या विषयातील भारतीय तत्त्वज्ञानाचा अभ्यास विषय निवडले आहे. भारतीय तत्त्वज्ञान जगातील अति प्राचीन तत्त्वज्ञान म्हणून ओळखले जाते. भारतीय तत्त्वज्ञानानी मानव व निसर्गनिर्मित अनेक समस्या, गुढ रहस्य याची तात्विक अंगानी उकल केली आहे. यातील प्रत्येक प्रश्न व समस्या यांचे उत्तर तत्त्वज्ञान या विषयाच्या अभ्यास चौकटीत राहून शोधण्याचा प्रयत्न अनेक भारतीय तत्त्ववेत्यांनी केला

आहे. तो आजही सुरू आहे असे म्हटले तर वावगे होणार नाही.

मानवी समाजाच्या इतिहासात अनेक मुर्त व अमुर्त कल्पना व विचारधारा आहेत. या विचारधारांना आपण तत्त्वज्ञान असे संबोधु. प्राचीन, मध्ययुगीन व आधुनिक अशा विविध काळखंडात अनेक तत्त्ववेत्ते भारतात होऊन गेले आहेत. ज्यांनी त्यांच्या काळात मानवी मनाला, बुद्धिला व समाजाला पडलेल्या अनेक प्रश्नांचे उत्तरे तर्क, निती, विवेक, विज्ञान यांच्या आधारे वैचारिक व व्यवहारीक स्वरूपात दिली आहेत.

प्रस्तुत संधोनासाठी संशोधकाने भारतीय तत्त्वज्ञानातील शैव तत्त्वज्ञान या अभ्यासविषयाशी संबंधित विषय संशोधनासाठी निवडला आहे. संशोधकाने शैव संप्रदायाचा तात्विक अभ्यास करून तत्कालीन, वर्तमान काळातील समस्यांवर शैवतत्त्वज्ञानात कांही उत्तरे आहेत का? याचा अभ्यास व्हावा म्हणून ''शैव तत्त्वज्ञान : एक चिकित्सक अभ्यास'' हा विषय संशोधनासाठी घेतलेला आहे.

२) संशोधनाची उद्दिष्टये :- (Objectives of Research)

प्रस्तुत संशोधन विषयावर संशोधन कार्य करताना संशोधकानी कांही उद्दिष्टांना प्रमाण मानुन संशोधन कार्यास प्रारंभ केला. ती उद्दिष्टये पुढीलप्रमाणे आहेत.

१. शैव तत्त्वज्ञानाचा अभ्यास करणे.

२. शैव तत्त्वज्ञानाची ऐतिहासिक पार्श्वभुमी अभ्यासणे.

३. शैव तत्त्वज्ञानाच्या तात्त्विक अधिष्ठाणाचा अभ्यास करणे.

४. शैव तत्त्वज्ञानाच्या सामाजिक तत्त्वज्ञानाचा, परंपरेचा, साहित्यांचा अभ्यास करणे.

५. शैव सिद्धांतावर आधारित विविध संप्रदायाचा अभ्यास करणे.

६. शैव तत्त्वज्ञानाची वर्तमानकालीन उपयुक्तकता व प्रासंगिकता अभ्यासणे.

३) संशोधनाची गृहितकृत्ये :- (Hypothesis of Research)

शैव तत्त्वज्ञान हे इतर भारतीय धर्माच्या तत्त्वज्ञानासारखेच आहे. परंतु शैव तत्त्वज्ञानामध्ये शिवाच्या स्वरूपाबद्दल केल्या गेलेल्या विकृतीकरणाचा विरोध केलेला आहे. शिवाचे स्वरूप हेच मुल अधिष्ठाण आहे. शैव तत्त्वज्ञान आध्यात्मिक व नैतिक प्रवृत्तीचे आहे. शैव तत्त्वज्ञानात तात्विक चिंतनाच्या मांडणीस प्रत्येक काळात स्तोत्र प्राप्त करून दिले. शिव तत्त्वज्ञानामध्ये केवळ शिवलिंग पुजा किंवा शिव आराधना यांना स्थान आहे. एवढेच नाही तर कोणत्याही अलौकिक शक्तिचे दैवीकरण किंवा देवाधिकरन ताज्य ठरविले आहे. या बाबतीत अनेक प्राचीन संदर्भ आहेत. शैव तत्त्वज्ञानाने समाजातील अनाचार, दुराचार यावर प्रबोधन करून समाज मनाची नैतिक मशागत केली आहे. शैव संप्रदायात आजही भारतभर त्याचे उपासक असंख्य आहेत. या तत्त्वज्ञानास वीरशैव लिंगायत तत्त्वज्ञान म्हणुनही पाहिले जाते. शैव तत्त्वज्ञानात साहित्य परंपरेची वर्तमानात उपयुक्तता आहे. शैव तत्त्वज्ञानानी तात्विक चिंतनाने आजच्या समाजातील धार्मिक व सामाजिक प्रश्न सोडविण्यास तेवढीच उपयुक्तता आहे.

यावरून प्रस्तुत प्रबंधाच्या अनुषंगाने सिद्धांत कल्पना अशी मांडण्यात येते की, ''शैव तत्त्वज्ञान हे गुंतागुंतीचे असणाऱ्या अनिष्ठ प्रथा, परंपरा यापासून दूर असून शैव तत्त्वज्ञानाची मांडणी केवळ निराकार निर्गुण असणाऱ्या 'सत्यम, शिवम्, सुंदरम्' शिवाचा विचार करणारी आहे. या दृष्टीने पाहता शैव तत्त्वज्ञानात जीव आणि जगताच्या स्वरूपाची विज्ञाननिष्ठ मांडणी केली आहे. जे आधुनिक नैसर्गिक शास्त्राच्या जवळची असली पाहिजे.'' समाजाची सोडवणूक करून, एक सत्यमार्गाला मार्गस्थ करणारे आहे. केवळ परमपूज्य असणाऱ्या शिव भगवंताच्या चरणी लीन होवून त्याची मनोभावे उपासना करून आपला व

आपल्या संपूर्ण समाजाचा नैतिक, सामाजिक, धार्मिक व तात्विक भावनेचा एक निस्वार्थ विकास साधणे हा आहे.

४) संशोधन समस्या :- (Research Problems)

संशोधन समस्या हा कोणत्याही संशोधनाचा आत्मा असतो. कारण संशोधक त्याला पडलेल्या तात्विक, राजकीय, आर्थिक, शैक्षणिक, सामाजिक इत्यादी प्रश्नाचे उत्तर शोधण्याच्या चौकटीत राहून शोधून त्यास समाज व राष्ट्राच्या समोर मांडून त्यावर उत्तरे सांगतो. अगदी याचप्रमाणे संशोधकास भारतीय सामाजिक तत्त्वज्ञान या अभ्यास शाखेतील सामाजिक जगाचा तात्विक अंगाने अभ्यास करणाऱ्या तत्त्ववेत्यांचे जीवनचरित्रांचा अभ्यास करण्याची आवड आहे. आपल्या या आवडीस संशोधनाचा आधार घेवून पूर्ण करता येण्याची संधी पीएच. डी. च्या माध्यमातून प्राप्त होत आहे. हे ओळखून संशोधकानी प्राचीन काळापासून समाजाला मार्गदर्शन करीत आलेला 'शैव तत्त्वज्ञान : एक चिकित्सक अभ्यास ' हा विषय अभ्यासासाठी निवडला आहे.

या अभ्यासाच्या माध्यमातून शैव संप्रदायाने तत्कालीन शतकात कशाप्रकारे समकालीन समाजिक, धार्मिक, तात्विक चिंतनाचा अभ्यास केला. या अभ्यासातून शैव तत्त्वज्ञान विचारप्रर्वतकांनी नेमकी कोणत्या नवीन सामाजिक व धार्मिक चिंतनाची मांडणी केली जे तात्विक चिंतन प्राचीन काळापासून २१ व्या शतकातील समाजमनावर आजतागायत प्रभावी आहे. अशी कोणती तात्विक नाविन्यता, आधुनिकता व मुल्यविचार त्यांच्या तत्त्वज्ञानात आहेत ? या प्रश्नाचे उत्तर शोधावे म्हणून संशोधकांनी हा विषय संशोधनासाठी निवडला आहे.

प्रस्तुत विषय संशोधनासाठी घेण्याचे किंवा याबाबत संशोधकास पडलेले वरील विविध प्रश्नांची उत्तरे शोधण्याचे आणखीन एक महत्त्वाचे कारण म्हणजे या विषयावर

अद्याप कोणीही विद्यापीठ स्तरावर सदर विषयी संशोधन कार्य केले नसल्याचे दिसून आले.

५) संशोधन पद्धती :- (Research Methodology)

प्रस्तुत संशोधन विषयावर संशोधन करण्यासाठी केवळ संशोधकानी संश्लेषणात्मक आणि विश्लेषणात्मक पद्धतीचा आधार घेवून हे कसंशोधन कार्य पूर्णत्वास घेवून जाण्याचा संशोधकाचा प्रयत्न राहील.

६) तथ्य संकलन :- (Data Collection)

प्रस्तुत संशोधन कार्यासाठी तथ्य संकलनातील प्राथमिक व दुय्यम तथ्य संकलन पद्धतीचा वापर केला जाईल.

शैव संप्रदायातील सर्व हस्तलिखीतांचा आढावा घेवून संशोधन करण्यात येईल. शिलालेख, आदी ग्रंथलेखन, ताडपत्री, विविध मंदीर इत्यादी.

शैव तत्त्वज्ञानाविषयी संपादित पुस्तके, नियतकालीके, वर्तमानपत्रे, इंटरनेट आदी दुय्यम स्तोत्राचा वापर करण्यात येईल.

७) संशोधनाची मर्यादा व व्याप्ती :- (Scope & Limitation of Research)

प्रस्तुत संशोधन विषयाची मर्यादा व व्याप्ती स्पष्ट करणे आवश्यक आहे. कारण

त्यामुळे संशोधनाची चौकट निश्चित होते. तसेच संशोधकाची भटकंती होत नाही. परिणामतः वेळ व पैसा यांची बचत होते. प्रस्तुत संशोधन विषयाची मर्यादा केवळ आणि केवळ शैव तत्त्वज्ञानाच्या अभ्यासा पुरतीच मर्यादीत आहे. प्रसंगानुरूप इतर धार्मिक चिंतनाचा अभ्यास करण्यात येईल. जो विषयाचा आशय स्पष्ट करण्यापुरता मर्यादीत असेल.

८) संशोधनाची उपयुक्तता :- (Utility of Research)

शैव तत्त्वज्ञान विज्ञाननिष्ठा, ज्ञाननिष्ठा यावर आधारलेली आहे. मुर्तीपुजा ही शैव तत्त्वज्ञानात स्विकारली जात नाही. परंतु केवळ धर्मांधतेच्या नावावर आज शैवधर्मात कर्मकांड मोठ्याप्रमाणात वाढलेला आहे. जे मुळ शैव तत्त्वज्ञानाच्या विरूद्ध दिशेनी जाणारे आहे. प्रस्तुत संशोधनामुळे ज्या मुळ शैव तत्त्वज्ञानाचा विसर पडलेला आहे. त्यावर थोड्या प्रमाणात का होईना प्रकाश पडेल ज्यामुळे अंधःश्रद्धा, कर्मकांड दूर करण्यासाठी हा विज्ञाननिष्ठ अभ्यास करण्याचा प्रयत्न प्रस्तुत संशोधनातून करण्याचा प्रयत्न होणार आहे.

प्रत्येक संशोधन हे त्याची उपयुक्तता सिद्ध करणारे असते. विशेषतः मानवी कल्याण व नवनविन शोध हा त्यामागचा भाव असतो. सामाजिक शास्त्रातील संशोधन हे देखील अनेक अंगानी उपयुक्त असते. विशेषतः सामाजिक प्रश्नांची सोडवणूक करणे, मानवी मन व बुद्धिस चालना, सामाजाला तार्कीक व विवेकी बनविणे, सामाजिक अज्ञान दूर करणे, समाजाला एखाद्या विषयाची नव्याने ओळख करून देणे. आपण संशोधन ज्या अभ्यास शाखेअंतर्गत करणार आहोत त्या अभ्यास शाखेस नविन संकल्पना, नविन शब्द, नविन दिशा देणे. आपल्या आवती भोवती असणाऱ्या व्यक्तिच्या सामाजिक, राजकीय, धार्मिक, वर्तनाचा अभ्यास करून त्यातील स्वभाव , सद्गुण व दोषांचे वर्णन करणे, आपले संशोधन राष्ट्राच्या किंवा शासनास नितीनिर्धारण करण्यासाठी उपयुक्त होईल. याचा विचार करून होणारे संशोधन उपयुक्त संशोधन असते. तर्क, विवेक, विज्ञान, मानवी मुल्य याचा आधार घेवून आपणास पडलेल्या प्रश्नाचे उत्तर शोधण्याच्या दिशेने होणारे संशोधन आपली उपयुक्तता सिद्ध करणारे असते.

९) संशोधन आराखडा :- (Research Design)

प्रकरण पहिले :- प्रस्तावना.

प्रकरण दुसरे :- शैव तत्त्वज्ञान

प्रकरण तिसरे :- विविध शैव संप्रदाय

प्रकरण चौथे :- शैव तत्त्वज्ञानाची २१ व्या शतकातील प्रासंगिकता आणि उपयुक्तता.

प्रकरण पाचवे :- निष्कर्ष.

१०) संदर्भ ग्रंथ सुची :-

१) **Bhandarkar R. G. - Vaishnavism, Saivism & Minor Religious Systems, Varanasi (1965)**

२) कंगले र. पं., अनु. श्री. मन्माधवाचार्य प्रणीत सर्वदर्शन संग्रह, मुंबई (१९८५)

३) तगारे ग. वा. – शैवदर्शन, पुणे (१९८७)

४) शोधगंगा – शिव गीता एक आलोचनात्मक अध्ययन गुगलस्त्रोत

५) दाते कर्वे – महाराष्ट्र शब्द भाषा कोश (भाग १) (१९८८)

६) जोशी लक्ष्मण शास्त्री – मराठी विश्वकोष (खंड २, ५)
महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई (१९७६) (खंड १५) (१९९५)

७) जोशी ग. ना. – भारतीय तत्त्वज्ञानाचा बृहद् इतिहास (खंड १,२,३)
शुभदा सारस्वत प्रकाशन पुणे (१९९४)

८) जोशी, महादेव शास्त्री – भारतीय संस्कृती कोश (खंड ३)
भारतीय संस्कृती कोश मंडळ, पुणे, प्रथम आवृत्ती (१९६५)

९) जोशी, महादेव शास्त्री – भारतीय संस्कृती कोश कोशमंडळ

१०) एकनाथ दर्शन – संपा. न. शे. पोहनेरकर,
एकनाथ संशोधन मंदिर, औरंगाबाद (१९५२)

११) परमरहस्य – प्रकाशक : देशीकेंद्र महाराज, लातूर (१९५४)

१२) भारतीय तत्त्वज्ञान – श्रीनिवास दिक्षीत, कोल्हापूर (१९६३)

१३) भक्तिमार्ग – प्रदीप व्हीनस प्रकाशन, पुणे (दुसरी आवृत्ती) (१९६७)

१४) वाङ्मय – जुने नवे संशोधन, पंडीत आवळीकर (१९६४)

१५) परमरहस्य – संत शिरोमणी श्री मन्मथ स्वामी विरचित परमरहस्य अध्याय जंगमवाडी मठ शैव संस्थान

१६) श्रीशिवमहापुराण – जितेन्द्रनाथ ठाकूर, धार्मिक प्रकाशन संस्था, मुंबई

१७) श्रीसिद्धान्त शिखामणि : – शिवयोगि शिवाचार्य विरचितः, शैव भारती शोध प्रतिष्ठान, जंगमवाडीमठ, वाराणसी

१८) शिवस्वरोदय– शिव–पार्वती संवाद, रणधिर प्रकाशन, हरिद्वार, (जानेवारी २०२०)

१९) कौन है शैव – प्रज्ञानंद गिरिजी महाराज